CS (Main) Exam:2015

C–AVZ–O–NSLA

# MARATHI

**Paper—I**

**(Literature)**

*Time Allowed : Three Hours* | *Maximum Marks : 250*

**QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS**

***Please read each of the following instructions carefully before attempting questions :***

*There are **EIGHT** questions divided in Two Sections.*

*Candidate has to attempt **FIVE** questions in all.*

*Question Nos. 1 and 5 are compulsory and out of the remaining, **THREE** are to be attempted choosing at least **ONE** question from each Section.*

*The number of marks carried by a question/part is indicated against it.*

*Answers must be written in **MARATHI**.*

*Word limit in questions, wherever specified, should be adhered to.*

*Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.*

---

## SECTION—A

Q.1. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (150) शब्दांत लिहा :— 10×5=50

Q. 1(a) 'भाषा ही ध्वनिसंकेतांनी बनलेली संप्रेषण प्रणाली असते' या विधानाचे स्पष्टीकरण करा. 10

Q. 1(b) प्रमाण भाषेचे महत्त्व आणि तिची समाजव्यवहारातील आवश्यकता स्पष्ट करा. 10

Q. 1(c) 'अहिराणी' बोलीची वैशिष्ट्ये सोदाहरण सांगा. 10

Q. 1(d) म्हणी आणि वाक्प्रचार यांतील फरक सांगून त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व विशद करा. 10

Q. 1(e) 'पोवाडा' या काव्यप्रकाराचे वेगवेगळे विशेष सांगा. 10

Q. 2(a) मानवी भाषाव्यवहाराच्या अभ्यासातील सोस्यूर आणि नोम चॉम्स्की या भाषावैज्ञानिकांच्या भाषाविषयक संकल्पनांचे स्पष्टीकरण करा. 20

Q. 2(b) बोली भाषेची वैशिष्ट्ये आणि बोलीविषयक समजुती यांविषयी चर्चा करा. 15

Q. 2(c) मानवाची भाषा आणि मानवेतर प्राण्यांची भाषा यांतील फरक स्पष्ट करा. 15



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

Q. 3(a) तेराव्या शतकाकडून सतराव्या शतकाकडे जाताना मराठी भाषेत कोणकोणते बदल होताना दिसतात ? 20

Q. 3(b) नाम व सर्वनाम म्हणजे काय ते सांगून विशेषनाम, भाववाचक नाम आणि धातुसाधित नाम यांचे सोदाहरण विवेचन करा. 15

Q. 3(c) मराठीतील विभक्तींचे प्रत्यय आणि त्यांचे कारकार्थ सांगून द्वितीया आणि चतुर्थी या समान प्रत्यय असलेल्या विभक्तींतील भेद स्पष्ट करा. 15

Q. 4(a) लोकसाहित्य म्हणजे काय ते सांगून, साहित्य आणि संस्कृती यांच्या दृष्टीने लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्व स्पष्ट करा. 20

Q. 4(b) प्रयोगरूप लोककलांचे प्रकार कोणकोणते आहेत ? त्यांपैकी तमाशा या लोककलेचे स्वरूप उलगडून दाखवा. 15

Q. 4(c) लावणी या काव्यप्रकाराची माहिती देऊन त्याच्या सादरीकरणातील वैशिष्ट्यांचा आढावा घ्या. 15

## SECTION—B

**Q.5. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (150) शब्दांत लिहा :— 10×5=50**

Q. 5(a) 'लीळाचरित्र' या ग्रंथातून तत्कालीन समाजाचे दर्शन कशा प्रकारे घडले आहे ते सांगा. 10

Q. 5(b) संत नामदेवांनी भागवत धर्माचा विस्तार कोणकोणत्या मार्गांनी केला ते विशद करा. 10

Q. 5(c) मध्ययुगीन मराठी साहित्याने धर्मजीवनातील कोणकोणते विचारप्रवाह आपल्यामध्ये सामावून घेतले आहेत ? 10

Q. 5(d) दलित कवितेला विद्रोही कविता असे का म्हटले गेले, ते स्पष्ट करा. 10

Q. 5(e) नवकथांचे वेगळेपण कोणकोणत्या वैशिष्ट्यांमधून प्रकट झालेले दिसते, ते विशद करा. 10

Q. 6(a) साहित्याचे प्रयोजन कोणकोणत्या प्रकारचे असते, त्याचा थोडक्यात आढावा घ्या. 20

Q. 6(b) साहित्याची समीक्षा ही एखादी साहित्यकृती अधिक चांगल्या तऱ्हेने समजून घेण्यासाठी आवश्यक असते का ते स्पष्ट करा. 15

Q. 6(c) साहित्याचा समाजाशी असलेला संबंध कशाप्रकारचा असतो, त्याचे विवेचन करा. 15

Q. 7(a) वारकरी पंथातील संतांच्या शिकवणीतून सामाजिक समतेचा आणि नीतीचा पुरस्कार कशा प्रकारे झालेला दिसतो, त्याची चर्चा करा. 20

Q. 7(b) पंडिती काव्यातील कारागिरी ही त्यातील काव्याला दुय्यमत्त्व आणणारी होती असे तुम्हास वाटते का, ते सकारण सांगा. 15

Q. 7(c) मराठीतील प्रायोगिक नाटकांची परंपरा रेखाटा. 15

Q. 8(a) विजय तेंडुलकरांच्या नाटकातील स्त्रियांचे चित्रण विविधांगी कसे आहे, त्याची चर्चा करा. 20

Q. 8(b) ग्रेस यांच्या कवितेतील भाषेचे नवे प्रयोग कशा प्रकारचे आहेत, ते सोदाहरण सांगा. 15

Q. 8(c) मराठीतील स्त्रियांचा कथेची ठळक वैशिष्ट्ये कोणती ते उदाहरणांसह स्पष्ट करा. 15



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial